Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 1, April 2023; Pages 05 –08

Original Research Article

# महात्मा बसवेश्वर व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारातील साम्यस्थळे

**डी. आर. पाटील**

इतिहास विभाग, देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स अँड सायन्स कॉलेज चिखली, ता. शिराळा, जि. सांगली.

*E-mail:* drpatil7090@rediffmail.com

Received: 10 February, 2023 | Accepted: 13 March, 2023 | Published: 14 March, 2023

**प्रस्तावना**

जगाला शांतीचा आणि जात,धर्म मुक्तीचा संदेश देणारे गौतम बुद्ध हे प्राचीन कालीन समाजपरिवर्तनाचे अध्वर्यू ठरतात.बुद्धांनी घालून दिलेली ही परिवर्तनवादी विचारांची पायवाट मध्ययुगामध्ये महात्मा बसवेश्वरांनी तर १९ व्या शतकामध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी पक्की करण्याचा प्रयत्न केला.भारतातल्या जातिव्यवस्थेने अनेकांचा अंत केलेला आहे.त्याचप्रमाणे जातिव्यवस्थेचा अंत करण्याचाही प्रयत्न अनेकांकडून झाला. महात्मा बसवेश्वर आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचार आणि आचारकार्यात अनेक साम्यस्थळे आढळून येतात. जातीय विषमता भेदभाव अथवा श्रेष्ठ-कनिष्ठता बसवेश्वरांनी कोणत्याच अर्थाने समर्थनीय मानलेली नाही. जमीन, पाणी, रक्त या गोष्टी सर्वांच्याच सारखे असतात. विश्व निर्मितीस कारणीभूत असलेल्या पंचमहाभूतात कसलाच भेदभाव नसतो. तर मानवा मानवात असा भेदभाव का ? असा प्रश्नही ते विचारतात. जातीय श्रेष्ठ-कनिष्ठ तर ते केवळ थोतांड असून अर्थहीन आहे. यासाठी त्यांनी भेदभाव प्रवृत्ती व पद्धतीवर अनेक प्रकारे प्रहार केला आहे. एकोणीसाव्या शतकानंतरही विसाव्या शतकामध्ये महाराष्ट्रा बरोबरच भारतामध्ये अनेक कुप्रथा आणि अस्पृश्यते सारखा प्रश्न समाजाच्या अस्तीत्वालाच नख लावत होता. या व अशा अनेक प्रश्नांसाठी किंबहुना समाजाच्या उन्नतीसाठी एकोणीसावव्या आणि विसाव्या शतकामध्ये अनेक समाजधुरीण झाले. विसाव्या शतकामध्ये जे काही समाजपरिवर्तनाचे मेरुमणी होते यापैकी दुर्लक्षित पण समाजाला एक नेक दिशा दाखवण्यामध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांचे काम महत्त्वाचे ठरते. ते कृतिशील समाजसुधारक, अस्पृश्योद्धारक, विचारवंत, भाषातज्ज्ञ, लेखक, धर्मप्रसारक, धर्माभ्यासक होते.

**महत्वाचे शब्द:** महात्मा बसवेश्वर, विठ्ठल रामजी शिंदे, पुणे, मनमाड, महाबळेश्वर, अक्कमहादेवी, अक्कनागम्मा उर्फ नागलांबीका, आयदकी लक्कमा, पद्मावती, शिवप्रिया, सातव्वा, रायम्मा, लिंगम्मा, रेमव्वे, लक्कम्मा, सत्यवती, गंगाम्बिका, निलंबिका

## उद्दिष्टे

१) महात्मा बसवेश्वर आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचार आणि आचारकार्यात अनेक साम्यस्थळे शोधणे.

२) महात्मा बसवेश्वर आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे उपेक्षित घटका विषयीचे योगदान अभ्यासने.

## गृहीतके

१) महात्मा बसवेश्वर आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचार आणि आचारकार्यात अनेक साम्यस्थळे सापडतात.

२) महात्मा बसवेश्वर आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी उपेक्षित घटकासाठी योगदानामुळे हा घटक मुख्य प्रवाहात येण्यास मोठी मदत झाली.

**कुडलसंगम येथे महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची जडणघडण**

महात्मा बसवेश्वरांनी सध्या कर्नाटकातील कुडलसंगम येथे आपल्या आयुष्याचा जवळपास एक तप कार्यकाळ तेथे व्यतीत केला.खऱ्या अर्थाने येथेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार मिळून ते कृतीशील विचारवंत आणि क्रांतिकारक समाज सुधारक बनण्यासाठी प्रशस्त वाट तयार झाली. तत्कालीन धर्मामध्ये असलेल्या चुकीच्या प्रथा सोडून खऱ्या खुऱ्या धर्माची आपण कास धरली पाहिजे असे त्यांची ठाम मत होते.सर्वात महत्त्वाचे म्हणजे तत्कालीन समाजामध्ये प्रचलित असलेल्या भेदभावा बद्दल त्यांच्या मनात प्रचंड तिरस्कार होता. आपण सर्वजण समान आहोत लहान अथवा थोर असा कोणताही भेदभाव करता कामा नये या मतावर ते ठाम होते. तत्कालीन समाजामध्ये असलेल्या अंधश्रद्धा आणि धर्मातला पाखंडीपणा त्यांना अजिबात मंजूर नव्हता.त्यांची विचारसरणी कुडलसंगम येथील वास्तव्यात पक्की झाली व त्यांच्या जीवनाला एक नवा आया प्राप्त झाला.

**बसवाण्णांची जाती अंताची लढाई**

तत्कालीन समाजामध्ये जाती व्यवस्थेचे प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये स्तोम माजले होते. समाजाला एका सूत्रात बांधून ठेवण्या ऐवजी समाजाला विधिध जाती-पाती मध्ये विभागून टाकले होते. साहजिकच त्यावेळच्या समाजाची गती आणि प्रगती खुंटली होती. उच्चवर्णीय समाज आणि शूद्र यांच्यामध्ये जातिभेदाची रेषा आखण्यात आली. आखून दिलेल्या सीमारेषेच्या बाहेर जाण्याचा विचार सहजासहजी कोणाच्या मनात येत नव्हता इतका हा समाज गलीत गात्र झाला होता. या समाजावर लादलेल्या बंधनांचे समर्थन करण्यासाठी जुन्या धर्मग्रंथांचे सोयीने अर्थ लावले जात होते.त्यातच अस्पृश्यते सारख्या चुकीच्या प्रथेने समाज मरणासन्न अवस्थेस पोहचला. एका अर्थाने समाज अवनत अवस्थेमध्ये पोहोचला होता. महात्मा बसवेश्वरांनी जातीअंताचा लढा उभारताना अस्पृश्य समाजाशी आपले नाते निर्माण केले आपले स्वतःचे जन्मजात ब्राह्मणत्व ते विसरून त्यांनी आपले नाते अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या जातीशी जोडले.[१] तत्कालीन खालचा समजणाऱ्या समाजाला संघटित केले. समाजात अस्तित्वात असलेल्या विषमतेला त्यांनी टोकाचा विरोध केला त्याचवेळी समाजामध्ये समता प्रस्थापित व्हावी यासाठी त्यांनी धाडसी पावले टाकली.

**महात्मा बसवेश्वरांची स्त्री स्वातंत्र्या विषयीची भूमिका**

महात्मा बसवेश्वरांनी स्त्री आणि पुरुष असा कोणताही भेदभाव आखला नाही.त्यांनी स्त्री आणि पुरुषांना एका सूत्रामध्ये बांधले.समाजात आणि धार्मिक कार्यात पुरुषांच्या बरोबरीचे स्थान स्त्रियांना आहे अशी त्यांची ठाम भूमिका होती.स्त्री म्हणजे महादेवीचे रूप म्हणूनच तिला देवी समान प्रतिष्ठा आणि अधिकार आहेत असे ते आग्रहाने सांगत.[२] बसवण्णांना त्यांची मोठी बहीण नागलांबीका यांची मोठी साथ होती.या बहिणीच्या कार्यकर्तृत्वाचा आणि विचारांचा मोठा पगडा महात्मा बसवेश्वरांच्यावर असल्याचे दिसून येते. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने वागवण्याच्या त्यांच्या प्रयत्नामुळेच त्या काळात स्त्री संत निर्माण झाल्या त्यामध्ये अक्कममहादेवी चे स्थान मोठे होते. महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियांना मुख्य प्रवाहात घेण्याच्या भूमिकेमुळेच त्या काळात मोठ्या प्रमाणामध्ये कर्तृत्ववान स्त्रियांची मालिकाच निर्माण झाली. यामध्ये अक्कमहादेवी, अक्कनागम्मा उर्फ नागलांबीका, आयदकी लक्कमा, पद्मावती, शिवप्रिया, सातव्वा, रायम्मा, लिंगम्मा, रेमव्वे, लक्कम्मा, सत्यवती, गंगाम्बिका, निलंबिका अशा अनेक विद्वान स्त्रिया निर्माण झाल्या.[३]

**विठ्ठल रामजी शिंदे अस्पृश्य उद्धाराचे कार्य**

अस्पृश्य वर्गावर होणाऱ्या अन्यायाला छेद देण्यासाठी किंबहुना या वर्गाची त्यावेळची स्थिती सुधारण्यासाठी सृशवर्गातील लोकांनीच पुढे आले पाहिजे या मताशी ते ठाम होते. विलायते हून परत आल्यानंतर बडोदा संस्थानाचे अधिपती महाराज सयाजीराव गायकवाड यांनी त्यावेळी अस्पृश्य वर्गाच्या जेवढ्या म्हणून शाळा होत्या त्या शाळांची बारकाईने तपासणी करण्याचे काम विठ्ठल रामजी शिंदे यांच्यावर सोपवले. यातूनच त्यांना अस्पृश्य वर्गाची परिस्थिती जवळून पाहण्याची किंबहुना ती अनुभवण्याची संधी मिळाली. यातूनच त्यांची एक वैचारिक बैठक तयार झाली आणि ते स्पृश्य वर्गातील पुढारी या नात्याने अस्पृश्य वर्गाला पुढे आणण्यासाठी तयार झाले. खरे तर त्यांना उदारमतवादाची शिकवण घरीच लहानपणी मिळाली होती. नंतर ते महाविद्यालयामध्ये पुढील शिक्षणासाठी रुजूझाल्यानंतर त्यांच्या संस्कारांना विचारवादाची जोड मिळाली. उच्च वर्गाच्या मनात अस्पृश्या विषयी असलेली जी कल्पना होती, जो समज होता तो नाहीसा करून दोन्ही वर्गांना एकतेच्या धाग्याने जोडणे महर्षी विठ्ठल शिंदेंना आवश्यक वाटत होते. यासाठीच त्यांनी निराश्रीत साहाय्यकारी मंडळी ही अखिल भारतीय पातळीवर अस्पृशता निवारणाचे आणि अस्पृश्य मानल्या गेलेल्या वर्गाची उन्नती करण्याच्या हेतूने १८ ऑक्टोबर १९०६ रोजी स्थापन केली.[४]

इंग्लंड मध्ये महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जवळपास दोन वर्ष राहिले होते. युनिटेरियन धर्ममताच्या मंडळींनी चालवलेल्या डोमेस्टिक मिशन सारख्या संस्थेची किंबहूना सदर संस्था करत असलेल्या कार्याची गरज इथल्या आपल्या देशातील लोकांना आहे असे त्यांचे ठाम मत बनले होते. ही मिशन दीन-दुबळे, अपंग, लहान आणि वृद्ध इत्यादीसाठी परोपकार भावनेने काम करत होते. या कामातून त्यांचे दुबळयांचे दुःख कमी करण्याचे काम करत होते. या सर्वांचा जवळून अनुभव शिंदे यांनी इंग्लंडच्या दोन वर्षाच्या वास्तव्यामध्ये घेतला होता. त्याने स्वतः स्थापन केलेल्या मिशनच्या माध्यमातून माणसे मिळवण्याचा प्रयोग स्वतःच्या घरापासून केला. इतकेच नव्हे तर विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रभावामुळे सय्यद अब्दुल कदर या तरुणाने मुंबई येथील इस्लामिया स्कूलमधील शिक्षकाची नोकरी करत असून सुद्धा ती सोडली व प्रार्थना समाजाची दीक्षा घेतली. तेव्हापासून ते शिंदे यांच्या मिशनचे अजिव कार्यवाह बनले.[५] त्यांनी स्थापन केलेल्या मिशनचा पुढे कामाचा एवढा व्याप वाढला की त्यांच्या पुणे, मनमाड, इगतपुरी, इंदूर, अकोला, अमरावती, दापोली, मंगळूर, मद्रास, महाबळेश्वर व नाशिक या ठिकाणी शाखा सुरू झाल्या आणि येथून अस्पृशोद्धाराचे व त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे कार्य जोमात सुरू झाले. एवढेच नव्हे तर अस्पृशोद्धाराच्या ध्येयाने झपाटलेले विठ्ठल रामजी शिंदे कुटुंबासह महार वस्तीत जाऊन राहिले. त्यांच्या या कृतीमुळे मराठा त्यांना 'महार-मराठा' म्हणत तर महार त्यांना 'मराठा' म्हणत.[६] दोन्ही समाजाने त्यांना उपेक्षितच ठेवले. विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निर्मुलनाच्याक्षेत्रात केलेल्या कामाची दखल मात्र हव्या त्याप्रमाणात घेतली नसल्याचे चित्र आहे.

**विठ्ठल रामजी शिंदे यांची मराठा समाजा विषयीची भूमिका**

विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म जमखंडी येथे खानदानी मराठा कुटुंबात झाला. शिंदे यांनी आपल्या सामाजिक जिवनात अस्पृश्य समाजाच्या ऊन्नतीसाठी किंबहूना त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काम केले. त्यासाठी प्रसंगी महारवाड्यात कुंटुबकबिला हालविला. असे जरी असले तरी ज्या समाजात आपण जन्मलो तो महाराष्ट्रातला प्रमुख मराठा समाज बहुसंख्य आहे. त्या समाजाच्या गती आणि प्रगतीवर महाराष्ट्राची गती आणि प्रगती अवलंबून आहे असे त्यांचे ठाम मत होते. म्हणूनच या समाजात सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक डोळसपण येणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांना वाटे.

मराठा समाजाने केवळ मुख्य प्रवाहातच नव्हे तर या समाजाने प्रगतीची विविध शिखरे पार केल्या शिवाय राष्ट्रोन्नती होणार नाही. म्हणूनच या समाजातील सुशिक्षीत मराठ्यांच्या विषयी त्यांची म्हणून एक भूमिका होती. २० जून १९१४ या दिवशी पुण्यातल्या मराठा स्टुडंटस् ब्रदरहुड या संस्थेच्यावतिने आयोजित कार्यक्रमात 'सुशिक्षित मराठ्यांची नागरिक कर्तव्ये' या विषयावर त्यांनी आपले विचार सर्वासमोर ठेवले. खरे तर याच संस्थेच्या आदल्यावर्षी १९१३ साली शाहूवाडी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) वडगांव सारख्या छोट्याश्या खेड्यातील रावबहादूर पांडुरंग चिमणाजी उर्फ पी. सी. पाटील-थोरात यांचे 'विलायतचा प्रवास' या विषयावर त्यांनी आपले विचार प्रस्तुत केले होते. १९११ ला विलायतेला शेतकी शिक्षणासाठी पी. सी. पाटील गेले होते. विठ्ठल रामजी शिंदे यांनी व्याख्यानातून मराठा समाज आणि इतर जाती यांच्यात कोणत्या व कश्याप्रकारचे संबंध असायला हवे याची मांडणी त्यांनी विस्तृत पणे केली होती. मराठ्यांची शिक्षण, साहीत्य, इतिहास याबाबतीतली गैरहजेरी यावर ते बोट ठेवतात. देशपातळीवर चाललेल्या स्वराज्याच्या चळवळीला मराठ्यांनी पाठिंबा दिला पाहिजे अशी भूमिका महर्षी शिंदे यांनी घेतली तर टिळकांनी एकूणच ब्राह्मणेतरांना समान पातळीवरून वागवण्याची हमी दिली.[७]

**विठ्ठल रामजी शिंदे यांचे स्त्री शिक्षणासाठीचे प्रयत्न**

स्त्री शिक्षणाचा वारसा अण्णासाहेब तथा महर्षी शिंदे यांना घरातूनच वारश्याच्या रूपाने प्राप्त झाला होता. महर्षी शिंदे यांच्या वडिलांनी जमखंडी सारख्या संस्थानामध्ये मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू करण्याचा प्रयत्न केला होता. हाच पुरोगमित्वाचा पगडा शिंदे यांच्यावर होता. पुणे नगरपालिकेने आपल्या हद्दीत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यासंदर्भात हालचाली सुरू केल्या होत्या. परंतु यामध्ये मुलींच्या शिक्षणाबाबत कोणतीही हालचाल नव्हती.जहाल पुढाऱ्यांचे मत मुलींच्या शिक्षणाच्या आड येत होते. तर ब्राह्मणेतर व मवाळ पुढाऱ्यांचे मत असे होते की, मुलांच्या बरोबरीनेच मुलींनाही प्राथमिक शिक्षण सक्तीचे असले पाहिजे. यामध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांचाही समावेश होता. ते एवढ्या वेळेस थांबले नाहीत तर मुलींना सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे किती गरजेचे आहे याबाबतीत त्यांनी आपली जाहीर मते वर्तमानपत्रांच्या माध्यमातून मांडून समाजामध्ये स्त्री शिक्षणाच्या बाबतीमध्ये जागरूकता आणण्याचा सचोटीने प्रयत्न केला. त्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळेच स्त्रियांच्या मध्ये जागरूकता निर्माण झाली आणि पुण्यासारख्या शहरांमध्ये सक्तीचे महिला शिक्षण व्हावे यासाठी महीलांचे मोर्चे निघाले आणि जागोजागी स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून देणाऱ्या कोपरा सभा सुद्धा मोठ्या प्रमाणामध्ये घेण्यात आल्या.

**विठ्ठल रामजी शिंदे यांची शेतकऱ्यांच्या विषयीची भूमिका**

ब्रिटिश आमदनीतील शेतकऱ्यांची अवस्था दिवसें दिवस बिकट होत चालली होती. अशातच अंधश्रद्धा, दारिद्र्य आणि अज्ञान यामुळे त्याला अधिक हातभार लागत होता. सरकार शेतकऱ्यांच्या समस्या कडे लक्ष देत नव्हते. अशा अवस्थेमध्ये शेतकऱ्यांना संघटित करणे आणि त्यांच्यासाठी सुधारणा घडवून आणण्याचे काम महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले. शेतकरी वर्गाची हलकीचे जीवन आणि दुष्काळाचा वेळोवेळी त्यांना करावा लागणार सामना यातूनच त्यांना या शेतकरी वर्गाची हालकीची परिस्थिती कशी सुधारेल याबाबत महर्षी शिंदे चिंतामग्न होते. एवढेच नव्हे तर त्यांनी शेतकऱ्यांच्या मध्ये जागरूकता यावी यासाठी शेतकरी चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेतला. १९२८ साली मुंबई सरकारने तुकडी बंदीचे व सारावाडीचे बिल मंजूर करून घेण्याचा विचार चालला होता. मुंबई सरकारच्या या संकल्पित बिलाला विरोध करण्याच्या हेतूने पुण्यात २५ व २६ जुलै १९२८ रोजी मुंबई इलाका शेतकरी परिषद भरण्यात आली. या परीषदेला शिंदे यांनी यशस्वीपणे मार्गाने केले.[८] पुण्यातल्या या परिषदेला मुंबई इलाख्याबरोबरच कर्नाटकातून सुद्धा मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित राहिले. या परिषदेच्या माध्यमातून शेतकरी वर्ग आपल्या प्रश्नांची तड सरकारच्या विरोधात जाऊन न्यायमार्गाने सोडवू शकतो हा आत्मविश्वास शेतकरी वर्गामध्ये निर्माण झाला. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखालीच दक्षिणसंस्थानातील तेरदाळ येथे सुद्धा शेतकरी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. अशा शेतकरी परिषदा पुढे जाऊन तालुकावार सुद्धा आयोजित केल्या जाऊ लागल्या. एकंदरीतच महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची शेतकऱ्यांच्या बद्दल असणारी आस्था, शेतकऱ्यांच्या प्रश्नांची समज, दुष्काळ व अन्य समस्येच्या गर्तेत सापडलेल्या शेतकऱ्याला या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना यांची चांगली जाण त्यांना होती. ते नुसतेच व्यासपीठावरून मार्गदर्शन करून थांबत नव्हते तसेच सल्ला आणि उपदेश देऊन निघून जात नव्हते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे समुळ उच्चाटन व्हावे यासाठी अग्रेसर होते.

**निष्कर्ष**

महात्मा बसवेश्वर आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्यामध्ये जवळपास सातशे वर्षांचे अंतर होते. परंतु दोघांच्याही वैचारिक क्रांतीमध्ये कोणतेही अंतर असल्याचे दिसून येत नाही. कारण दोघांच्याही वाट वेगळया असल्या तरी ध्येय मात्र एक होते. ते म्हणजे उपेक्षितांना, दलितांना, शुद्रांना आणि स्त्रियांना एकाच सामान धाग्यामध्ये गुंफून त्यांना समानतेची वागणूक देणे. सुरुवातीला दोघांनाही त्यांच्या सामाजिक कार्याला प्रखर विरोध झाला. अशा अवस्थेतही दोघांनी आपला कृतिशील सामाजिक बाणा कधी ढळू दिला नाही.महात्मा बसवेश्वर व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे कृतिशील विचारवंत होते. स्वतः महात्मा बसवेश्वर जन्माने ब्राह्मण असूनही त्यांनी अस्पृश्य समाजाशी नाळ जोडली तर विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्यांनी आपला कुटुंबकबिला घेऊन महारवाडा जवळ केला. अस्पृश्य समाजाला मानवतेच्या दृष्टिकोनातून वागवले पाहिजे किंबहूना त्यांना मुख्य प्रवाहात आणले पाहिजे यासाठी दोन्ही विभूतिंनी कसोशीने प्रयत्न केले. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षणाच्या समान संधी असो किंवा दोघांनीही केलेली अस्पृश समाजातली जाणीव जागृती असो त्यांच्या कृतिशील कार्याची पावती ठरते.म्हणूनच महात्मा बसवेश्वर आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचार आणि आचारकार्यात अनेक साम्यस्थळे आढळून येतात.

**संदर्भ**


१) देशपांडे सुभाष , महात्मा बसवेश्वर कार्य आणि कर्तृत्व,जनशक्ती चळवळ, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २१ मार्च २०१५, पृ. ११९

२) डॉ. हिरेमठ मांतेश, शिविम संशोधन पत्रिका, (संपा.) नंदकुमार मोरे, अंक ३१ वा,प्रकाशक प्रकाश दुकळे, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर-२०२२, पृ.८०

३) देशपांडे सुभाष , उपरोक्त, पृ.१३४

४) पवार गो. मा., महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य, मनोविकास प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, १५ मे २०१९, पृ. २२०

५) उपरोक्त, पृ. २२८

६) देशपांडे राजीव (संपा.), अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र, देवदत्त कदम यांचा महाराजा सयाजीराव आणि विठ्ठल रामजी शिंदे हा लेख, अंक २ रा, फेब्रुवारी २०२३, पृ. १०

७) डॉ. मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा, राजहंस प्रकाशन, पुणे, खंड पहिला, दुसरी आवृत्ती, १९ मार्च २००७, पृ. ३४३

८) पवार गो. मा., उपरोक्त, पृ. ४४८